# ।। ज्योतिर्मय ।।

Online Journal of Literature.... साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २४८ वा ❑ गुरूवार दि.२७ नोव्हेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


# कला शिक्षणाची वाताहत थांबवण्यासाठी संबंधित स्वतंत्र विद्यापीठ स्थापण्याचा कायदा करा-डॉ श्रीपाद जोशी

**✱ प्रस्तावित कायद्याचे प्रारूप सरकारला सादर ✱ संबंधित विद्यापीठ स्थापनेसाठी अशासकीय तज्ज्ञांची समिती यथाशीघ्र नेमली जावी ✱महाराष्ट्र सांस्कृतिक आघाडीचे मुख्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री व कला संचालक यांना पत्र**

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**पुणे** – राज्यातील कला शिक्षणाची वाताहत आणि अवहेलना थांबावी आणि महाराष्ट्राला असलेली कलेची, कला शिक्षणाची उच्च परंपरा व दर्जा जपला जावा यासाठी, या राज्यात स्वतंत्र कला आणि संबंधित व आनुषंगिक विद्या विद्यापीठ स्थापले जावे या मागणीचा महाराष्ट्र सांस्कृतिक आघाडीने पुनरूच्चार केला असून तसे पत्र प्रमुख संयोजक डॉ श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी मुख्यमंत्री व उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांना पाठवले असून त्याची महाराष्ट्राचे राज्यपाल आणि कला संचालक यांना देण्यात आली आहे.

सर्वप्रथम, १९८३ साली तत्कालीन कला संचालक बाबूराव सडवेलकर यांनी सरकारला तसा प्रस्ताव दिला होता.सरकारने त्यानुसार पुढील आखणीच्या सूचना देखील केल्या होत्या. मात्र घडले काहीच नव्हते याचे स्मरण करून देत त्यानंतर महाराष्ट्र सांस्कृतिक आघाडीने संवाद – माध्यम विद्यापीठ स्थापना कृती समिती मार्फत, काळानुसार त्या प्रस्तावात सुधारणा करून,आंतरविद्याशाखीय स्वरूपाचे दृश्य कला, संवाद – माध्यम कला, भाषाविज्ञान, ललित कला अशा संबंधित ज्ञानशाखा एकत्र करून ते आंतरराष्ट्रीय विद्यापीठ स्थापण्याची मागणी केली व त्याचा अद्याप पाठपुरावा करत ती मागणी लावून धरली आहे याचेही स्मरण पत्रात शासनाला करून देण्यात आले आहे.

दरम्यान २००८ मध्ये तत्कालीन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांनी या पार्श्वभूमीवर ललित कला विद्यापीठ स्थापनेची घोषणा केली होती. मात्र त्याचेही पुढे काहीच झाले नाही. नुकतीच, कलामंडळ नाकारणारी व स्वतंत्र कला विद्यापीठ हवी असणारी जी कला विद्यापीठ स्थापना कृती समिती स्थापन झाली त्यांनी व महाराष्ट्र सांस्कृतिक आघाडीने मिळून पुनः अशा विद्यापीठ स्थापनेसाठी पाठपुरावा सुरूच ठेवलेला आहे. त्यासाठी सतत स्मरणपत्रंही महाराष्ट्र सांस्कृतिक आघाडी पाठवीत राहिली आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर आता या पत्रासोबत प्रस्तावित विद्यापीठासाठी कायद्याचे प्रारूप देखील डॉ श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी करून पाठवले आहे. तसेच हे प्रस्तावित विद्यापीठ प्रत्यक्षात आकाराला येण्यासाठी प्रस्तावित ज्ञानशाखांमधील अशासकीय तज्ज्ञांची समिती यथाशीघ्र नेमण्यात यावी अशी विनंतीही पत्रात करण्यात आली आहे.

## विशेष लेख...

# मंदिराच्या शिखरावरील ध्वजारोहणाचा अन्वयार्थ

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

रामभक्तांची प्रतीक्षा अखेर संपली. २५ नोव्हेंबर रोजी, विवाह पंचमीच्या शुभ मुहूर्तावर, अयोध्येतील राम मंदिरात ध्वजारोहण समारंभ पार पडला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १९१ फ ूट उंच शिखरावर २२११ फूट धर्मध्वज फडकावला.

ध्वज फडकवताच अयोध्या आणखी एका ऐतिहासिक क्षणाचा साक्षीदार झाला, ज्याने जगाचे लक्ष वेधून घेतले. ठरलेल्या शुभ वेळी, पंतप्रधानांनी राम मंदिराच्या मुख्य शिखरावर धर्मध्वज (पवित्र ध्वज) फडकावला. भगवा ध्वज वाऱ्यात फडकत असताना, संपूर्ण परिसर ‘‘जय श्री राम‘‘ च्या जयघोषाने दुमदुमून गेला. क्षणार्धात, वातावरण आध्यात्मिक उर्जेने भरले आणि भाविकांच्या भावना आनंदात रूपांतरित झाल्या.

अयोध्या येथील राम मंदिराच्या शिखरावर फडकवलेला भगवा ध्वज हा मंदिराचे बांधकाम पूर्ण झाल्याचे, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक पुनरुज्जीवनाचे प्रतीक आहे. हा ध्वज देवतेची उपस्थिती, शक्ती आणि संरक्षणाचे प्रतीक मानला जातो आणि सनातन धर्माच्या पारंपरिक मूल्यांचे प्रतिनिधित्व करतो.

ध्वज फडकवणे हे मंदिराचे बांधकाम आणि देवतेची प्राणप्रतिष्ठा पूर्ण झाल्याचे प्रतीक आहे.

आध्यात्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व: हा ध्वज मंदिराच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक पूर्णतेचे प्रतीक आहे, तसेच राष्ट्रीय एकात्मतेच्या एका नव्या अध्यायाची सुरुवात दर्शवतो.

वैदिक परंपरेनुसार, मंदिरात शिखरावर धर्मध्वज फडकवणे अनिवार्य मानले जाते, जे देवतेच्या उपस्थितीचे प्रतीक आहे.तसेच भगवा रंग त्याग, तप आणि प्रकाशाचे प्रतीक आहे, जो सनातन परंपरेचे प्रतिनिधित्व करतो. या ध्वजावर ॐ, सूर्यदेव आणि कोविदार वृक्ष यांसारखी धार्मिक चिन्हे कोरलेली आहेत, जी विशेष धार्मिक महत्त्व दर्शवतात.

हा पवित्र ध्वज प्रतिष्ठेचा, एकतेचा आणि सांस्कृतिक सातत्यतेचा संदेश देतो आणि रामराज्याच्या आदर्शांचे प्रतीक मानला जातो. हा धर्मध्वज मंदिराच्या शिखर वर फडकला , जो पारंपारिक उत्तर भारतीय नागर शैलीत बांधला गेला आहे, तर त्याच्या सभोवतालची सुमारे ८०० मीटर लांबीची भिंत दक्षिण भारतीय वास्तुकलेमध्ये डिझाइन केलेली आहे, जी मंदिराच्या स्थापत्य विविधतेचे प्रतिबिंब आहे.

मंदिर संकुलातील मुख्य मंदिराच्या बाह्य भिंतींमध्ये वाल्मिकी रामायणावर आधारित भगवान श्री रामाच्या जीवनातील ८७ गुंतागुंतीच्या दगडी दृश्ये आहेत. आजूबाजूच्या भिंतींमध्ये भारतीय संस्कृतीतील ७९ कांस्य कास्ट दृश्ये देखील आहेत.

खरं तर, २२ जानेवारी २०२४ रोजी भगवान श्री राम यांना बाल राम म्हणून प्रतिष्ठापित करण्यात आले. ५ जून २०२५ रोजी दुसऱ्या प्राण प्रतिष्ठा समारंभात, भगवान राम यांना राजा म्हणून प्रतिष्ठापित करण्यात आले. शेवटचे काम ध्वज स्थापित करणे होते. सनातन परंपरेत, मंदिरावर फडकणारा ध्वज मंदिराचा रक्षक, उर्जेचा वाहक आणि पूर्णता आणि देवाच्या उपस्थितीचे प्रतीक मानला जातो. ध्वजाद्वारेच मंदिर पूर्णत्व प्राप्त करते. २५ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११:५८ ते दुपारी १२:३० दरम्यान ध्वज फडकवण्याचा शुभ काळ निश्चित करण्यात आला. मंगल स्वस्तीच्या जप दरम्यान फडकवण्यात आला. ३२ मिनिटांचा हा शुभ काळ भगवान श्री रामांच्या जन्म नक्षत्र अभिजित मुहूर्ताशी जुळतो. निवडलेला दिवस मार्गशीर्ष महिन्याच्या शुभ पंधरवड्याच्या पाचव्या दिवशी होता, जो विवाह पंचमी म्हणून साजरा केला जातो. याच दिवशी भगवान श्रीराम आणि माता सीता यांचे दिव्य विवाह झाले होते.

ध्वजाच्या चिन्हांचा अर्थ ,:

भगवा रंग: ज्योत, प्रकाश, त्याग आणि तपश्चर्याचे प्रतीक आहे.

ध्वजस्तंभ: मंदिराच्या १६१ फूट उंच शिखरावर ३० फूट बाह्य ध्वजस्तंभ बसवण्यात आला आहे, ज्यामुळे ध्वज एकूण १९१ फ ूट उंचीवर फडकू शकतो.

सूर्यदेव: भगव्या ध्वजावर चित्रित केलेला सूर्य भगवान श्री रामांच्या सूर्यवंशाचे प्रतीक आहे.

ओम: परमात्म्याचे पहिले अक्षर, जे चेतना आणि शाश्वत सत्याचे प्रतिनिधित्व करते.

कोविदार वृक्ष: या वृक्षाला अयोध्येचे राजेशाही प्रतीक म्हणून पूज्य मानले जाते आणि वाल्मिकी रामायण आणि हरिवंश पुराणात त्याचा उल्लेख आहे. विद्वान म्हणतात की ते पारिजात आणि मंदार वृक्षांच्या मिलनातून निर्माण झाले आहे.र्मध्वजावर चित्रित केलेल्या कोविदार वृक्षाची अनोखी कथा: मान्यतेनुसार, कोविदार वृक्ष हा जगातील पहिला संकरित वनस्पती होता. भगवान रामाच्या वनवासादरम्यान, लक्ष्मण या कोविदार वृक्षावर चढला आणि भरत आणि त्याच्या सैन्याला जंगलाकडे येताना पाहिले. ही सर्व माहिती चंपत राय यांनी दिली आहे.

# श्री दत्त जन्मोत्सव स्मरणिका : एक दीपस्तंभ - डॉ. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**पुणे** – दत्त जन्मोत्सव निमित्त राक्षसभुवन येथील दत्त मंदिरात दि २७ नोव्हेंबर ते ७ डिसेंबर या काळात भव्य दत्त जन्मोत्सव सोहळा होत आहे व त्यानिमित्त ज्योतिर्मय प्रकाशन तर्फे स्पेशल श्री दत्त जन्मोत्सव स्मरणिका – अनुभूती विषेशांक काढण्यात आला आहे. या स्मरणिकेची पाने उघडताच एक उबदार नाद जणू कानाजवळ येतो जणू परंपरेच्या ज्योतीसमोर बसून एखादी घरगुती कथा ऐकावी तशी भावना जागी होते. हे पुस्तक केवळ लेखसंग्रह नाही; हे सांस्कृतिक स्मरणांचे दीपस्तंभ आहे, ज्यात भक्ती, परंपरा




आणि अनुभवांच्या अगणित ज्योती एकत्र येऊन उजळतात.

शीर्षकांच्या रांगांतून चालताना लक्षात येते की प्रत्येक लेख हा एक छोटासा दीप आहे. कुणी गुरूंच्या सहवासातील अलौकिक क्षण सांगतो, कुणी दत्तभक्तीच्या प्रवासातील अनुभूती अभिव्यक्त करतो. काही लेख तर स्मृतींच्या दारावर हलकेसे ठोके देऊन आपल्यालाच आपल्या आध्यात्मिक वाटचालीत डोकवायला भाग पाडतात.

भाषेचा सहज प्रवाह, साधेपणातील काव्य, आणि हळुवार प्रांजळपणा हे पुस्तक वाचताना सतत सोबत राहतात. एखाद्या दुपारच्या शांतवेळेसारखे हे मजकूर विणले आहेत. कुठे आठवणींचा सुवास येतो, कुठे भक्तीभावनेचा गहिरा नाद, तर कुठे अनपेक्षित प्रसंगात उमलणाऱ्या श्रद्धेची चमक.

पुस्तकाचे मांडणीकरण एक वेगळीच जाणीव जागवते. कृष्णवर्णी जलतरंगासारखी अक्षरे आणि चित्रांचे सौंदर्य मिळून जणू आध्यात्मिक रंगमंचच उभा राहतो. स्मरणिकेच्या प्रत्येक उघडलेल्या पानातून ‘ही परंपरा नित्य वर्धिष्णू आहे’ असा नीरव ध्वनी ऐकू येतो.

हे पुस्तक भक्तीच्या जगातील एक स्वच्छ आरसा आहे. वाचक जेव्हा त्यात स्वतःला पाहतो, तेव्हा त्याला जाणवते आपली आध्यात्मिक यात्रा असते अशा छोट्या, प्रेमळ स्मृतींमध्ये.

वाचनानंतरही या स्मरणिकेचा गंध मनात रहातो, मंद पण सतत जणू धुपासारखा. या स्मरणिकेसाठी परिश्रम घेणारे माननीय संपादक श्री संजय व्यापारी, त्यांची सर्व टीम आणि लेखक यांचे हार्दिक अभिनंदन! ही स्मरणिका कोणाला हवी असल्यास ७७४३९१८५५९ या नंबरवर संपर्क साधावा.



# रामायण केवळ कथा नाही, आदर्शाचा मार्ग-डॉ. धनश्री लेले

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**पुणे** –रामायण ही केवळ कथा नसून सदाचार, कर्तव्यभावना आणि सत्याच्या मार्गावर चालण्याचा संदेश देणारा जीवनमार्ग आहे, असे मत प्रख्यात निरुपणकार डॉ. धनश्री लेले यांनी व्यक्त केले. आजच्या पिढीला रामायण फक्त प्रभू श्रीरामाची गोष्ट वाटते, मात्र ते श्रीरामाने आचरणात आणलेला आदर्श मार्ग आहे, असेही त्या म्हणाल्या.

ग्रंथ पारायण दिंडी पुणे यांच्यावतीने अयोध्या येथे झालेल्या रामरक्षा पठण वर्षपूर्ती, चातुर्मासातील व्रताची सांगता आणि घरोघरी रामरक्षा स्तोत्र पठणाच्या संकल्पपूर्तीनिमित्त सदाशिव पेठेतील गीता धर्म मंडळ येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला परिमंडळ १ चे पोलीस उपायुक्त कृषीकेश रावले, रा.स्व.संघ कसबा भाग संघचालक प्रशांत यादव, डॉ. संजीव डोळे, संस्थेचे विरेंद्र कुंटे आणि नंदकुमार देव आदी उपस्थित होते.

डॉ. धनश्री लेले यांनी जीवनात वेळेचे महत्त्व अधोरेखित केले. त्या म्हणाल्या, ‘‘जर आपण ठराविक वेळेनुसार आहार घेतला, तर शरीरात जैविक घड्याळे तयार होतात आणि त्या विशिष्ट वेळीच आपल्याला भूक लागते. त्याचप्रमाणे, उपासना ठराविक वेळेला केल्यास मनालाही त्या वेळेची सवय लागते आणि उपासनेची भूक निर्माण होते.‘‘ नियमित उपासना केल्यास परमेश्वरही भक्तीची वाट पाहतो आणि उपासना न केल्यास परमेश्वरच आपल्या नावाने हाक मारतो, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी प्रशांत यादव म्हणाले की, आपल्या ग्रंथामध्ये कर्तव्याचा स्पष्ट उपदेश दिला आहे. देव, देश आणि धर्म ही जीवनशैली प्रत्येकाने मनापासून स्वीकारली पाहिजे आणि ती दैनंदिन व्यवहाराचा भाग झाली पाहिजे. जर प्रत्येकाने या मूल्यांचे पालन केले, तर भारताला महासत्ता होण्यापासून जगातील कोणतीही शक्ती रोखू शकत नाही, असे मत त्यांनी व्यक्त केले.

पोलीस उपायुक्त कृषीकेश रावले यांनी अशा संस्थांच्या कार्याची प्रेरणा घेऊन प्रत्येकाने आपला खारीचा वाटा उचलून काम केले पाहिजे, असे आवाहन केले. पुणे शहरासाठी काम करताना तुमच्याकडून येणाऱ्या सूचनांचा स्वीकार करून काम करेन, असे आश्वासनही त्यांनी दिले.

विरेंद्र कुंटे यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागील उद्देश स्पष्ट केला. अयोध्या येथे झालेल्या रामरक्षा पठण वर्षपूर्ती, चातुर्मासातील व्रताची सांगता आणि घरोघरी रामरक्षा स्तोत्र पठणाच्या संकल्पपूर्तीनिमित्त हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. प्रत्येक घरात रामरक्षा पठण झाले पाहिजे या संकल्पाची पूर्ती झाली असली तरी, हे कार्य पुढेही असेच सुरू राहावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

# वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख-१०२



"वास्तुशास्त्र पेंटींग" संदर्भात आपण काल म्हणजे या अगोदरच्या लेखात "पिवळ्या" रंगाची माहिती आणि महत्व वाचले. या लेखात आपण 'निळ्या' रंगाची माहिती घेवुयात.

रंगशास्त्रात पिवळा, निळा आणि लाल या तीन रंगांना "प्राथमिक रंग" म्हणतात कारण हे तिनही रंग इतर कोणत्याही रंगांच्या मिश्रणातून तयार होत नाहीत.

मात्र इतर सर्व रंग तयार करण्यासाठी या तीन रंगांना "बिल्डिंग ब्लॉक्स" म्हणून मानले जाते. पैकी आपण 'निळ्या' रंगाचं महत्व जाणून घेऊयात.

'निळा' रंग हा शांतता, स्थिरता आणि सुरक्षितता सारख्या भावनांशी जोडलेला आहे. 'निळा' हा संयम, शांतता, विश्वास आणि प्रसन्नतेचा द्योतक आहे. निसर्गात आकाशा सारखा आणि समुद्रासारखा आढळतो. निळ्याच्या अनेक छटा आहेत. फिक्कट निळा, आकाशी, गडद निळा असे विविध प्रकार निळ्या रंगाचे आहेत. "वास्तुशास्त्र पेंटींग" मध्ये तसेच इतर कला आणि डिझाइन मध्ये 'निळा' विशेष लोकप्रीय आहे कारण तो शांततेचं प्रतीक आणि प्रसन्न अनुभव देणारा दैवी घटक आहे.

श्री देवाधिदेव महादेव, श्री भगवान विष्णू, भगवान श्रीकृष्ण या देवतांचा रंग निळा आहे असे जाणकार सांगतात. म्हणून त्याला सुरक्षिततेचं प्रतीक मानतात. स्थिरता व शांतता; निष्ठा व विश्वास; अधिकार आणि सुरक्षितता; बुध्दिमत्ता व अध्यात्मिकता या सार्यांचा "निळ्या" रंगाशी अनन्यसाधारण संबंध आहे. आकाशाचा रंग निळा दिसतो कारण "प्रकाशाचे विकिरण" होतांना कमी तरंग लांबी मुळे निळा रंग इतर रंगांच्या तुलनेत जास्त विखुरला जातो त्यामुळे आकाश निळे दिसते.

निळा रंग हा सर्जनशील (क्रिएटीव्ह) बनवतो. म्हणून आपण 'वास्तुशास्त्र पेंटींग' मध्ये निळा आणि निळ्याच्या अनेक छटांचे, रंगाकारांत रुपांतर करतो. त्यामुळे त्या वास्तु मालकाच्या सृजनशीलते आणि सर्जनशीलतेत लक्षात यावा इतका बदल होतो.

क्रमश :

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान

डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238



## जात्यावरच्या ओव्या......

माझ्या हाताची बांगडी
हाला तालाचा पुरावा
सासर माहेरचा
ही न जोडला रे दुवा ॥३५॥

माझ्या कष्टाची कथा
सांगे बांगडीचा काच
नाही पुरावा दुसरा
देवा मनोमनी वाच ॥३६॥

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# अद्भूत, अदम्य, अनुपम, अनुकरणीय ... !




ज्योतिर्मय साहित्य

तो त्याच्यासाठी स्वर्गीय अनुभव असतो. आपलं उडणं अधिकाधिक निर्दोष व परिपूर्ण व्हावं यासाठी तो झटत असतो. त्याला गाठायचा असतो परिपूर्णतेचा स्वर्ग ! त्याच्या या प्रवासाची ही कथा. समाजात दोन प्रकारची माणसं असतात. आपल्या आखून दिलेल्या मार्गानं वाटचाल करणारी आणि चाकोरीबद्ध जीवन जगणे नाकारून काहीतरी वेगळं करू पाहणारी. अशा या दुस–या क्रमांकाच्या माणसांना असतो ध्यास परिपूर्णतेचा. ती स्वप्नं पाहतात, कल्पना करतात. आऊट ऑफ द वे जाऊन विचार करतात आणि स्वप्नांचा पाठलाग करतात. हे करताना त्यांना सापडतो अर्थ जगण्याचा. जो केवळ 'त्यांचा' असतो. कोणी तरी उसना दिलेला किंवा सांगितलेला नसतो. ते जे जगतात ते त्यांना सापडलेले, पटलेले नियम घेऊन. जोनाथन त्यातीलच एक !




केवळ समुद्राच्या पृष्ठभागालगत उडणे आणि मासे पकडून पोट भरणे एवढेच जोनाथनला मंजूर नाही. त्याची दृष्टी त्यापलीकडे पाहणारी आहे. आकाशात उंच झेप त्याला घ्यायची आहे. आपल्याला जे पंख दिले आहेत, ते केवळ समुद्रालगत उडून पोट भरण्यासाठी नाहीत असे तो मानतो. आपले पंख आकाशाला गवसणी घालण्यासाठी आहेत. त्यांच्या साहाय्याने आकाशात उंच भरारी घ्यायची आहे आणि तेथील आनंद लुटायचा हे त्याचे स्वप्न आहे. काहीतरी विशेष करायचं असेल तर आधी त्याचं स्वप्न नजरेसमोर असावं लागतं. तसं त्याचं हे स्वप्न !

पण केवळ स्वप्नं पाहून ध्येयप्राप्ती होत नाही. त्यासाठी ध्येयमार्गावर अविरतपणे चालत राहावं लागतं. महत्त्वाकांक्षेच्या स्वप्नांना प्रयत्नांचे पंख लावावे लागतात. हौसला बुलंद असावा लागतो. तसाच आपला हा जोनाथन आहे. तो सतत सराव करतोय. आपल्या पंखात बळ जमा करतोय. आपल्या स्वप्नांच्या दिशेने त्याचा प्रवास सुरु आहे. आता कोणी काही जगावेगळं करायला लागलं की लोक नावं ठेवणारच. जोनाथनालाही तसे अनुभव येतात. त्याचे बांधव त्याला वेड्यात काढतात. त्यांना त्याची कीव येते. त्यांना वाटते की असा किती उंच उडणार आहे हा ? आणि उडून उडून काय करणार ? एक दिवस त्याला आपल्यातच परत यावं लागेल. पण त्यांचा हा अंदाज जोनाथन चुकीचा ठरवतो. तो आपल्या ध्येयाशी प्रामाणिक आहे.

बाकीचे नावं ठेवत असताना तो आकाशाला गवसणी घालतो देखील ! पण उडणाऱ्यांना प्रोत्साहन देणाऱ्यांऐवजी त्यांचे पंख कसे कापता येतील अशा प्रवृत्तीची माणसे पक्ष्यात देखील आढळतात. त्यांच्याच जमातीतील एक ज्येष्ठ अण्णा, दादा किंवा तात्या त्याला विचारतात की आपल्याला ही उडण्याची जी मर्यादित क्षमता प्राप्त झाली आहे, ती मासे पकडून पोट भरण्यासाठीच. तू हा आगाऊपणा करून काय साध्य करू पाहतो आहेस ?

(क्रमशः)




## दासबोध स्तवन

उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# सृष्टीकथन

ज्योतिर्मय साहित्य

भगवान श्रीकृष्णांनी वरील भागात साधनामार्ग दाखवला. आई जसे लहानमुलाला सांगते तसे अज्ञानी माणसाचें मन द्रुश्य जगात रमते. त्या जगातील वस्तु घेऊनच परमात्म चिंतन कसे करावे हे विभूतीरूपाने श्रीकृष्णाने दाखवून दिले आहे. जसे की वादाने वाद वाढतो त्याला अंत नाही. म्हणून चतुराने संवाद करावा व ब्रम्हनंद भोगावा. पूर्वपक्ष आणि सिध्दांत हे शास्त्राचे संकेत आहेत. त्याचा खराअर्थ साधुसंताच्या तोंडून श्रवण केलेल्या उपदेशाने नक्कीच कळतो. आपण श्रवणभक्तित याचे विस्तृत विवेचन केले आहेच. तत्वज्ञान हा तर्कांचा खेळ आहे. त्यामध्ये अशी पध्दत आहे की समजा आपल्याला एक सिध्दांत मांडायचा आहे त्या सिध्दांतावर

जेवढ्या शंका व आक्षेप घेता येणे शक्य आहे तेवढ्या शंका व आक्षेप आपण स्वतः च कल्पना करून काढायचे व तर्कांने त्याचे निरसन करायचे. आक्षेपांना व शंकांना पूर्वपक्ष म्हणतात. व त्याच्या निरसनाला उत्तरपक्ष किंवा सिध्दांत म्हणतात. आक्षेपकाची कल्पना जितकी प्रबळ असते तितक्या शंका अधिक निघतात. सिध्दात्याला प्रत्येक शंकेचे निरसन करावे लागते ,खूपवेळा असे होते की नुसती खलनिष्पत्ती होत रहाते पण हाती काही रहात नाही. वादविवादात एकाहून एक वरचढ शंका निघतात पूर्वपक्ष व ऊत्तरपक्ष वेद शास्त्रामध्ये एवढे गुण भरलेले की त्याची शंका निष्पत्ती होऊ शकत नाही. आपले अध्यात्म शास्त्र एवढे प्रगल्भ आहे. म्हणून मित्रांनो एक सांगते वादविवाद च्या मागे लागु नका.तो सोडून संवाद साधावा. आत्मस्वरूपाचा अनुभव येतो व त्यामुळे ब्रम्हानंद प्राप्त होतो. कल्पना हे मायेचे मोठे शस्त्र आहे. माणसाला मिळालेली ही मोठी शक्ति आहे. ती योग्य वळणाने वापरली तर अगदी स्वस्वरूपापर्यन्त पोहचवते. पण तिला अयोग्य वळण लागले तर भ्रमाचे नाना प्रकार निर्माण करते. समर्थ सांगतात की

देवाच्या बाबतीत माणूस अगदीं भ्रामक कल्पना करतो त्यामुळे त्याला आत्यस्वपाचे दर्शन होत नाही व परमार्थ साधत नाही.

(क्रमशः)

# संत हे आपला संबंध भगवंताशी जोडतात.



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

आपले हृदय विषयाने इतके भरले आहे, की तिथे भगवंताच्या प्रेमाला जागाच राहिली नाही. बरे, भगवंताचे प्रेम मुद्दाम तिथे घातले, तर ते आत न राहता बाहेर पडते आणि वाऱ्यावर उडून जाते. सामानाने गच्च भरलेली जशी एखादी खोली असते, तसे आपले हृदय आहे. या हृदयाचा संबंध भगवंताशी जोडण्यासाठी, आपल्या हृदयातले सामान, म्हणजे विषय, खाली करून त्याच्या जागी भगवंताचे प्रेम भरणे जरूर आहे. साधारणपणे आपला अनुभव असा आहे की, एखादी वस्तू आपल्याला पुष्कळ आणि पुन्हापुन्हा मिळाली तरी तिचा वीट येतो; म्हणून जी वस्तू आपल्याला कितीही मिळाली तरी तिचा वीट येणार नाही अशी वस्तू आपण मिळवावी. अशी अवीट असणारी वस्तू एकच आहे; ती म्हणजे भगवंत होय.

राजाने आपल्या नावाचा शिक्का केला, आणि जो अती प्रामाणिक होता त्याच्याजवळ दिला; त्याप्रमाणे भगवंताने आपले नाम संतांना दिले. त्यामुळे, संत जे करतील त्याला मान्यता देणे भगवंताला जरूरच आहे. आपण आणि संत यांच्यामध्ये मनुष्य या दृष्टीने फरक नाही; पण फरक आहे तो हा की, संत हा जसे बोलतो तसे वागतो, तर आपण बोलतो चांगले आणि वागतो मात्र त्याच्या उलट. आपल्या स्वार्थाच्या आड कोणी आले की आपण वाईट बोलतो. ज्याच्यावर आपण प्रेम करतो त्याच वस्तूवर दुसऱ्याने प्रेम केले तर आपण त्याला नावे ठेवतो. आपण नुसती नीतीची तत्त्वे जेव्हा सांगतो तेव्हा अगदी चांगले बोलतो; पण वागताना मात्र उलट वागतो. यासाठी आपण अशी कृती करू या, की आपल्याला नंतर तसे बोलता येईल.

गाडीत बसायला मिळावे म्हणून काही कोणी गाडीत बसत नाही तर आपल्या स्टेशनाला जाण्यासाठीच मनुष्य गाडीचा आधार घेतो. तसा, मोठमोठ्या संतांनी प्रपंच केला खरा, परंतु तो सुखासाठी केला नाही. आपल्या वृत्तीपासून न ढळता इतरांना तारण्याचे काम संतांनी केले. बुडणाऱ्या माणसाला जसा दोरीचा आधार द्यावा, त्याप्रमाणे संतांनी आपल्याला परमात्म्याचा आधार दिला. चंदनाच्या झाडाजवळच्या झाडांना जसा चंदनाचा वास लागतो, त्याप्रमाणे संताजवळ राहतो तोही संतच बनतो. काही कष्ट न करता परमार्थ साधणे हेच सत्संगतीचे महत्त्व आहे.

आपण प्रपंचात इतके खोल जातो की संतांची हाकच ऐकू येत नाही. ती ऐकू येईल इतक्या तरी अंतरावर असावे.

डॉ. अमोल पाथ्रीकर,
मानसोपचार तज्ज्ञ.
मो. 88889 92688

## पालकांसाठी महत्वाचे



# मुलांना ठेवा परीक्षेच्या ताणापासून चार हात दूर

ज्योतिर्मय साहित्य

दुखापत किती गंभीर आहे यावर त्याची तीव्रता अवलंबून असते.

पौष्टिकतेची कमतरता:

आवश्यक जीवनसत्त्वे, विशेषतः व्हिटॅमिन बी १२ च्या कमतरतेमुळे मेंदूच्या कार्यावर परिणाम होऊ शकतो.

यामुळे गोंधळणे आणि विसरणे ही लक्षणे आढळून येतात. संतुलित आहार घेतल्याने स्मरणशक्तीचे रक्षण होण्यास मदत होते.

धूम्रपान : दारू किंवा मादक पदार्थ्यांचे व्यसन मेंदूला होणारा ऑक्सिजनचा पुरवठा कमी करतात.

यामुळे कालांतराने स्मरणशक्ती कमी होऊ शकते.

मानसिक आजार : झोप न लागणे, नैराश्य, स्किझोफ्रेनीया या सारखे मानसिक आजार स्मृती कमी होण्यास कारणीभूत असू शकतात.

जास्त ताणतणाव स्मरणशक्ती आणि एकाग्रतेवर परिणाम करतात.

स्मरणशक्ती कमी होण्याची लक्षणे :

अलीकडील घटना आठवण्यात अडचण, अल्पावधीत काय घडले ते आठवत नाही, नावे आणि भेटी विसरणे, महत्त्वाच्या तारखा किंवा लोकांची नावे वारंवार विसरणे,

वेळ आणि ठिकाणाबद्दल गोंधळ : सध्याच्या वेळेबद्दल किंवा स्थानाबद्दल दिशाहीन होणे.

पुनरावृत्ती होणारे प्रश्न : उत्तरे आठवत नसल्यामुळे तेच प्रश्न अनेक वेळा विचारणे.

दैनंदिन कामांमध्ये अडचण : पूर्वी सोपी असलेली परिचित कामे पूर्ण करण्यात अडचण येणे.

स्मरणशक्ती कमी होणे कसे टाळता येईल?

शारीरिकदृष्ट्या सक्रिय रहा, व्यायामामुळे तुमच्या मेंदूत रक्तप्रवाह वाढतो. रोज किमान ४५ मिनिटे चालणे किंवा योगा आणि हलका व्यायाम करणे.

तुमचा मेंदू व्यस्त ठेवा.मानसिक क्रियाकलाप तुमच्या मेंदूला तीक्ष्ण ठेवतात.

कोडी सोडवणे, पत्ते खेळणे, गाणी ऐकणे, एखादे वाद्य शिकणे आणि वाजवणे तुमच्या मेंदूला तीक्ष्ण ठेवण्यास मदत करतात.

सामाजिक राहणे.. मित्रांशी किंवा कुटुंबाशी वारंवार बोला आणि त्यांच्याशी संपर्क साधा.

सामाजिकीकरणामुळे ताण आणि नैराश्य कमी होण्यास मदत होते, ज्यामुळे स्मरणशक्तीवर उत्तम परिणाम होतो.

कामे आणि भेटींचा मागोवा घेण्यासाठी नोटबुक, कॅलेंडर किंवा फोन प्स वापरा.

गोष्टी चांगल्या प्रकारे लक्षात ठेवण्यासाठी मोठ्याने पुन्हा सांगा, चाव्या आणि ग्लास सारख्या आवश्यक वस्तू एकाच ठिकाणी ठेवा, पुरेशी झोप घ्या. झोप तुमच्या मेंदूला आठवणी साठवण्यास मदत करते. बहुतेक प्रौढांना दररोज रात्री ७–९ तासांची झोप आवश्यक असते.

मेंदूला निरोगी आहार द्या, फळे, भाज्या आणि संपूर्ण धान्य खावे, भरपूर पाणी प्या.

जास्त प्रमाणात मद्य किंवा ड्रग्जचा वापर टाळा – ते स्मरणशक्तीला हानी पोहोचवू शकतात.

आरोग्य स्थिती व्यवस्थापित करा, उच्च रक्तदाब, मधुमेह आणि नैराश्य यासारख्या आरोग्य समस्या नियंत्रणात ठेवा. तुमच्या डॉक्टरांच्या सल्ल्याचे पालन करा आणि नियमितपणे औषधे तपासा. (क्रमशः)




# शिक्षण सर्वांनाच उपयोगाचं?

ज्योतिर्मय साहित्य

५. शारीरिक–गतिक बुद्धिमत्ता :

वैशिष्ट्ये : शरीराचा अचूक वापर, हात–पायांची समन्वयक्षमता

उदाहरण : खेळ, नृत्य, अभिनयात गती असलेली, हाताने वस्तू तयार करणारी मुलं

करिअर : खेळाडू, नर्तक, अभिनेता, सर्जन (शस्त्रक्रिया करणारा डॉक्टर)

६. आंतरवैयक्तिक बुद्धिमत्ता :

वैशिष्ट्ये : इतरांशी संवाद, सहकार्य, संघटन कौशल्य

उदाहरण : मित्रांसोबत चांगले संबंध ठेवणं, इतरांचं मन जाणून घेणं

करिअर : शिक्षक, समुपदेशक, टीम लीडर, व्यवस्थापक

७. अंतर्मुख (स्व) बुद्धिमत्ता

वैशिष्ट्ये : स्वतःचं आत्मपरीक्षण, स्वभाव समज, शांतपणे विचार करणं

उदाहरण: एकटे राहून विचार करणारी, स्वतःचे निर्णय स्वतः घेणारी मुलं

करिअर: लेखक, तत्त्ववेत्ता, समुपदेशक, संशोधक

८. नैसर्गिक बुद्धिमत्ता

वैशिष्ट्ये : निसर्ग, प्राणी, झाडं, हवामान यांची जाण

उदाहरण : प्राणी–पक्षी ओळखण्यात रस असणारी, निसर्गाशी जोडलेली मुलं

करिअर: कृषी–तज्ञ, पर्यावरणतज्ज्ञ, जीवशास्त्रज्ञ, वनाधिकारी

९. अस्तित्ववादी बुद्धिमत्ता

वैशिष्ट्ये : जीवन, मृत्यू, अस्तित्व, आत्मा अशा गहन विषयांवर विचार करण्याची क्षमता

उदाहरण : जीवनाचा अर्थ, धर्म, अध्यात्म यावर लहान वयात विचार करणारी मुलं

करिअर: तत्त्ववेत्ता, अध्यात्मिक गुरु, लेखक, शिक्षक.

मुलांची आवड

आवड हीच एखाद्या क्षेत्रात पुढे जाण्याची खरी प्रेरणा असते. ज्या गोष्टीत मुलांचे मन रमतं, तीच गोष्ट ते मनापासून शिकतात. जर मुलाला संगीत, कला, खेळ, लेखन, संगणक यामधील काहीतरी आवडत असेल, तर त्याला त्या दिशेने प्रोत्साहन दिल्यास ते त्या क्षेत्रात नक्कीच प्रगती करतील. आवड नसलेल्या क्षेत्रात त्यांना अभ्यास करायलाच कंटाळा येतो. (क्रमशः)



## आरोग्य संजीवनी

# पहाटेची लवकर उठण्याची अमर्याद ताकद...

ज्योतिर्मय साहित्य

तुम्ही सकाळी किती वाजता उठता...?

हेल एरॉल्ड नावाचं एक जगप्रसिद्ध व्यक्तिमत्व आहे, ते एक प्रचंड यशस्वी व्यावसायीक होते, मोठ्या जिद्दीने त्यांनी एका अपघातामुळे आलेल्या शारिरीक विकलांगतेवर मात केली होती.

पण २००८ च्या महामंदीत त्यांचा प्रचंड लॉस झाला, अब्जोपती हेल कर्जबाजारी झाला.पण तो हार मानणारा नव्हता, यातून बाहेर कसं पडावं, हे विचारण्यासाठी तो आपल्या एका यशस्वी मित्राकडे गेला, मित्राने त्याला काय सल्ला दिला असेल बरं?

''हेल, तु सकाळी लवकर उठ!'' ''बाकी सगळं आपोआप होईल''या चमत्कारिक सल्ल्याने हेल निराश झाला, त्याला काहीतरी आगळेवेगळे उपाय अपेक्षित होते, काही दिवस त्याने कसेबसे ढकलले, पण दिवसेंदिवस निराशा त्याला घेरत होती, मग नाईलाज म्हणुन त्याने सकाळी चार वाजता उठायची सुरुवात केली, आणि हेल सांगतो, त्याचं आयुष्यच बदलुन गेलं!

पहाट आणि सुर्योदय इतके जादुई असतात का...?

इतक्या सकाळी उठुन काय करावं? ह्या प्रश्नावर हेल ने एक कोडवर्ड सांगितला..

ह्या आयुष्य बदलुन टाकणाऱ्या सहा सवयी आहेत...

१) ध्यान..

शांत बसुन स्वतःच्या आत डोकावणे, म्हणजे ध्यान!

स्वतःच्या आतल्या चेतनेला स्पर्श करणे, म्हणजे ध्यान!

मनाच्या कॉम्पुटरला फॉर्मेट करुन व्हायरस रिमुव्ह करणे म्हणजे ध्यान!

मन प्रफुल्लीत आणि ताजतवानं करण्यासाठी आवश्यक असते ध्यान!

माणसाच्या गरजा किती कमी आहेत, आणि सगळ्या चिंता किती व्यर्थ आहेत याची आत्मप्रचिती म्हणजे ध्यान!

अफाट, अदभुत आणि आनंददायी विश्वशक्तीसोबत स्वतःला जोडून घेणे, आणि स्वतःच्या मन–शरीराचा कणकण प्रफ

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

ुल्लित करवुन घेण्याची कृती म्हणजे ध्यान!

२) सकारात्मक स्वयंसूचना..

अफरमेशन्स म्हणजे स्वसंवाद! स्वतः स्वतःला सुचना देणं, प्रचंड शक्तिशाली असलेल्या अंतर्मनावर आपण निश्चित केलेलं ध्येय कोरणं!

येत्या पाच वर्षात, येत्या एक वर्षात, पुढच्या एका महिन्यात, पुढच्या एका आठवड्यात, आणि आज दिवस भर मी काय काय करणार आहे, याचं मनातल्या मनात पुन्हा पुन्हा रिव्हीजन करणे म्हणजे स्वयंसूचना!

स्वयंसुचनांमुळे कल्पना खोल अंतर्मनात झिरपतात, आणि नाटकीयरित्या सत्यातही उतरतात.

अंतर्मनाची शक्ती प्रचंड असल्यामुळे तिथे रुजलेला प्रत्येक विचार मग तो चांगला असो की वाईट, खराच होतो.

एखादी गोष्ट हजारो वेळा बोलली तर ती अंतर्मनात प्रक्षेपित होते, मग अशुभ कशाला बोलायचे?

वाईट बोलुन विनाशाला आमंत्रण देण्यापेक्षा, 'या सुखांनो या'!

३) .(चांगल्या कल्पना मनात घोळवणे)...

तीव्र इच्छा पुर्ण झाली आहे, अशी मनातून कल्पना करणं, ती पूर्ण झाल्याचा आनंद व्यक्त करणं आणि मनःपटला वर तिला बारीक सारीक रुपात साकारणं, म्हणजे व्हिज्वलायजेशन!

कल्पनाशक्ती ही निसर्गाने माणसाला दिलेली सर्वात अनमोल आणि सर्वात प्रभावशाली भेट आहे.

(क्रमशः)

# केरेन सुवर्णा यांचा ''सप्टेंबर २१'' इफ्फी गोवा २०२५ मध्ये झळकला

**ज्योतिर्मय साहित्य**

**गोवा** – २२ वर्षांच्या युवा फिल्ममेकर केरेन क्षिती सुवर्णा यांच्या दिग्दर्शनाखालील ''सप्टेंबर २१'' आता जागतिक प्रेक्षकांसाठी एक हृदयस्पर्शी सिनेमॅटिक अनुभव घेऊन आली आहे. ही फिल्म एनएफडीसीच्या फिल्म बाजारातील प्रतिष्ठित व्ह्यूइंग रूममध्ये प्रदर्शित झाली, जे ५६ व्या भारतीय आंतरराष्ट्रीय फिल्म महोत्सव (इफ्फी) २०२५, गोवा दरम्यान आयोजित करण्यात आले.

चित्रपटाने आधीच मोठी चर्चा निर्माण केली असून, या वर्षाच्या क्युरेटेड यादीतील सर्वाधिक प्रतिक्षित चित्रपटांपैकी एक ठरला आहे. ''सप्टेंबर २१'' हा एक तीव्र भावनिक नाट्यचित्र आहे, जो अल्झायमरच्या आजाराची दुनिया आणि त्यासोबतच्या केअरगिव्हिंगच्या अदृश्य संघर्षांना अत्यंत मानवी, सहज आणि



वास्तवदर्शी पद्धतीने मांडतो. स्मरणशक्ती हरवत चाललेल्या व्यक्ती आणि त्यांची काळजी घेणाऱ्यांमध्ये निर्माण होणारा निस्वार्थ, जिव्हाळ्याचा आणि भावनिक संबंध चित्रपट अतिशय संवेदनशीलतेने दाखवतो. केअरगिव्हिंगशी निगडित मानसिक, भावनिक आणि सामाजिक परिणामांवरही चित्रपट प्रकाश टाकतो, जे अनेकदा दुर्लक्षित राहतात.

कथानक एका वृद्ध व्यक्तीच्या प्रवासावर आधारित आहे, ज्यांना अल्झायमरचे निदान झाले आहे. ही भूमिका प्रवीण सिंग सिसोदिया यांनी अत्यंत प्रभावी आणि वास्तविकतेने सजवली आहे. त्यांच्या सोबत प्रियंका उपेंद्र कमलाच्या भूमिकेत दिसतात एक समर्पित केअरगिव्हर जी कर्तव्य, करुणा आणि भावनिक नात्यांमध्ये सातत्यानं समतोल राखताना दिसते. दोघांच्या अभिनयामुळे चित्रपटाचा भावनिक पाया अधिक ठोस बनतो.

चित्रपटात झरीना वहाब, अमित बेहल, अजित शिधये, रिकी रुद्रा, विनी, आणि सचिन पाटेकर यांच्या भूमिकादेखील महत्त्वपूर्ण आहेत. अल्झायमरचा परिणाम फक्त रुग्णापुरता मर्यादित न राहता कुटुंब, नातेसंबंध आणि संपूर्ण केअरगिव्हिंग व्यवस्थेपर्यंत पोहोचतो, हे चित्रपट प्रभावीपणे दाखवतो.

युवा दिग्दर्शक केरेन क्षिती सुवर्णा विषयाला विलक्षण परिपक्वता, संवेदनशीलता आणि प्रामाणिकतेने हाताळतात. चित्रपटाचा हेतू केवळ कथा सांगणे नसून समाजात जागरूकता, समज आणि संवाद वाढवणे हा आहे. चित्रपटाचे निर्मितीकरण हमारा मूव्ही, एफएमडी विसिका फिल्म्स आणि फिल्म्स मॅक्स यांनी केले आहे. कथा राज शेखर यांनी लिहिली असून, चित्रपटाचे संवाद भूपेंद्रकुमार नंदन आणि विनय सांडिल्य यांनी लिहिले आहेत. संगीत विनय चंद्रा यांनी दिले असून, ते चित्रपटाच्या भावनांना आणखी खोलवर नेतं. फिल्म बाजारातील प्रदर्शना नंतर, ''सप्टेंबर २१'' चा २०२६ च्या सुरुवातीला प्रदर्शित होण्याचा अंदाज आहे. भूपेंद्र नंदन व प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर

# मी मराठी...

**ज्योतिर्मय साहित्य**

आता काळाच्या गरजेप्रमाणे इंग्रजी, हिंदी या भाषा नोकरी, व्यवसाय, प्रवास या सर्व गोष्टींसाठी नवीन पिढीला अत्यंत गरजेच्या आहेतच. परंतु, आपली मातृभाषा मराठी याचीही थोडीफार ओळख प्रत्येक व्यक्तीला असणे गरजेचे आहे.

मराठी भाषेचे सौंदर्य, कोमलता, कणखरपणा, जरब, जबाबदारी, खणखणीत पणा, रांगडेपणा, अलंकार, नाजूकता, प्रेमळ भावना, भक्ती रस्ता, श्रद्धा अशी असंख्य रुपे मराठी माध्यमातून, या भाषेतून निर्माण होतात. मराठी भाषेची प्रत्येक गावा प्रमाणे बोलीभाषा बदलत असली, थोडेफार शब्द इकडेतिकडे झाले तरी थोडाफारअर्थ समजू शकतो, या भाषेत एकाच शब्दाला, वस्तू ला चारपाच वेगवेगळे शब्द असू शकतात. ते असो. नवीन पिढीला मराठी भाषा अवगत असायला हवी. खरे तर प्रत्येक मराठी माणसाने आपल्या मुलांना इतर भाषांचे ज्ञान दिले तरी आपली मातृभाषा शिकविणे अत्यंत गरजेचे आणि मोलाचे आहे. आमच्या वेळी शाळेत मराठी, हिंदी, संस्कृत, इंग्रजी या चारही भाषा महत्वाच्या असायच्या.



आणि आपली मातृभाषा, व्याकरणशुद्ध मराठी भाषा प्रत्येक मराठी माणसाला यायला हवी यासाठी जास्तीत जास्त मराठी भाषेचा प्रसार, आणि प्रचार व्हायला हवा आहे.

जरी प्रत्येक व्यक्ती कवी, लेखक, भाषाशास्त्रज्ञ, कीर्तनकार, व्याकरणकार असा कोणीही झाला नाही तरी गरजेप्रमाणे मराठी येणे आवश्यक आहे. कारण माय मराठी भाषेत भावनांची जी गुंतवणूक आहे, जो रसास्वाद आहे, जे सौंदर्य प्रत्येक अक्षरात, अलंकाराच्या आहेत ते इतरत्र तेवढे जाणवत नाही, बाकी कोणत्याही जातीतील लोकांनी कोणतीही भाषा बोलो, पण मराठी माणसाने इतर भाषेबरोबरच आपल्या मराठी भाषेला प्राधान्य दिले पाहिजे. ही मराठी भाषा मराठी लोकांची हृदय स्वामिनी आहे, तिच्यातील अर्थपूर्ण भाव हृदयापर्यंत पोहोचणारे आहेत.

मी कोणी भाषांतर, लेखक, कवी नाही, फक्त जे वास्तव आहे ते समोर मांडले, जर आपली पुढची पिढी जर मराठी चे महत्व जाणे, तर समजा की, आपली पुढची पिढी खऱ्या अर्थाने आपल्याजवळ राहिल, कारण मराठी भाषेला तेवढाच आपुलकीचा धरबंध आहे, राहिल. मुले इंग्रजी मिडियममध्ये शिकायला काहीच हरकत नाही, पण मराठीशी फारकत नको. उलट सर्व पालकांनी आपल्या मुलांना मराठी भाषा, शुभंकरोति, परवचा, छोटे श्लोक वगैरे गोष्टी वेळेनुसार थोड्या तरी शिकवायला हव्यात. तसेच काही सुसंस्कार मुलांना शिकवायला हवेत. म्हणजे आपली भाषा आपल्यापासून दूर जाणार नाही. शुद्ध लेखन, व्याकरण, सुलेखन, निबंधलेखन, पत्र लेखन, अर्ज लेखन, सुविचार, म्हणी, वाक्प्रचार हा मराठी भाषेचा पाया तरी नीट शिकवायला हवा.



स्वप्न गंधा सतीश आंबेतकर
मुंबई. विरार.

जे आपण आपल्या लहानपणी शिकलो त्यातील ५० टक्के तरी पुढील पिढीला आताच्या पिढीने शिकवायला हवे आहे. विचारधारा सहजपणे लिहिली गेली, कुणाला पटेल की नाही माहीत नाही.

## महात्मा फुले स्मृतिदिनानिमित्त विद्यापीठात विशेष व्याख्यान

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – महात्मा जोतीराव फुले स्मृतिदिनानिमित्त महात्मा फुले प्रतिष्ठान व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी, २८ नोव्हेंबर रोजी ''महात्मा जोतीराव फुले : काळ आणि कर्तृत्व'' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

नांदेड येथील साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखक व कवी श्रीकांत देशमुख या विषयावर बोलणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. विजय फुलारी असतील.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील महात्मा फुले सभागृहात सकाळी ११ वा. आयोजित विशेष व्याख्यानाला उपस्थित राहण्याचे आवाहन महात्मा फुले प्रतिष्ठानचे संचालक प्रा. डॉ. आनंद उबाळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राचे संचालक प्रा. डॉ. सुनील नरवडे आणि कुलसचिव प्रा. डॉ. प्रशांत अमृतकर यांनी केले आहे.







# पुण्यात ६ डिसेंबरला सुनीताबाई देशपांडे स्मृती साहित्य संमेलन

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** – ज्येष्ठ लेखिका सुनीताबाई देशपांडे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त एक दिवसीय स्मृती साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे संमेलन शनिवार, ६ डिसेंबर २०२५ रोजी पुण्यात होणार असून, ज्येष्ठ लेखिका, कवयित्री डॉ. अरुणा ढेरे या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी असतील.

विदिशा विचार मंच आणि कोहिनूर कट्टा यांच्या संयुक्त विद्यमाने या संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. विदिशा विचार मंचच्या संस्थापक-संचालक ममता क्षेमकल्याणी आणि समन्वयक नितीन जळूकर यांनी ही माहिती दिली.



संमेलन सकाळी ९.३० ते दुपारी ३.३० या वेळेत वि.का. राजवाडे सभागृह, भारत इतिहास संशोधक मंडळ, सदाशिव पेठ, पुणे येथे पार पडेल. कोहिनूर ग्रुपचे चेअरमन आणि कार्यकारी संचालक कृष्णकुमार गोयल हे या कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष आहेत.

कार्यक्रमाचा शुभारंभ सकाळी ९.३० वाजता पं. सत्यशील देशपांडे यांच्या स्वरांजली या कार्यक्रमाने होईल. यामध्ये सुनीताबाईंना आवडणाऱ्या बंदिशींचे सादरीकरण पं. सत्यशील देशपांडे करणार आहेत. सकाळी १०.३० वाजता ज्येष्ठ दिग्दर्शक जब्बार पटेल यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होईल. यावेळी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष आणि महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील.

दुपारी १२.३० वाजता साहित्यिक सुनीताबाई या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. ज्येष्ठ लेखिका रेखा इनामदार-साने या चर्चासत्राचे अध्यक्षस्थान भूषवतील आणि त्या सुनीताबाई देशपांडे यांच्या आहे मनोहर तरी या पुस्तकावर भाष्य करतील. प्रसिद्ध लेखिका मोनिका गजेंद्रगडकर मण्यांची माळ या पुस्तकावर, तर प्रसिद्ध लेखक डॉ. आशुतोष जावडेकर सोयरे सकळ या पुस्तकावर बोलतील.

दुपारी २.३० वाजता कवितांजली या कार्यक्रमाद्वारे रसिकांना पु.ल. आणि सुनीताबाई देशपांडे यांनी अभिवाचन केलेल्या कवितांचा पुन्हा अनुभव घेता येईल. याचे संहितालेखन डॉ. अरुणा ढेरे यांनी केले असून, डॉ. वंदना बोकील-कुलकर्णी आणि विराज सवाई अभिवाचन करतील.

# ''प्रतिभास'' - कल्पनेपलिकडचा अद्भुत शब्दप्रवास

**ज्योतिर्मय साहित्य**

''प्रतिभास'' हा सौ प्रतिभा चौगले यांचा काव्यसंग्रह म्हणजे कल्पनेच्या पलीकडाचा शब्दांमधून घडलेला अनोखा प्रवास आहे. यातील रचना ह्या ओघवत्या शब्दांनी नकळत लेखणीतून उतरलेल्या आहेत. कवियत्रीने सुरवातीला छंद म्हणून केलेल्या कविता अनेक ऑनलाईन समूहांमध्ये दिसायला लागल्या आणि बघता बघता त्यांचे स्वरूप आणखीन खुलू लागले.

कवियत्रीने शब्दांचे नितांत सुंदर रूप कधी अभंगातील ओव्यातून, भक्तीमय रचनेतून, कधी जीवनातील विविध पैलूंचा विचार करून, तर कधी निसर्गाच्या कुंचल्यातून साकारले आहे.

या संग्रहातील मुक्तछंद काव्यरचना लयबद्ध शिस्तीत राहून जीवनाचे वास्तव दर्शवतात. तर काही रचना संगीतबद्ध केलेल्या आहेत.

''प्रतिभास''- काव्यसंग्रह
इ-पुस्तक, कवियत्री : सौ प्रतिभा चौगले
प्रकाशक : मराठीसृष्टी
इ-पुस्तक खरेदीसाठी आजच खालील लिंकवर क्लिक करा :
https://marathibooks.com/books/pratibhas-by-pratibha-chougale/
किंमत : रु.८०/- सवलत किंमत : रु.५०/-







# मीनाक्षी मंदिर मदुराई

**ज्योतिर्मय साहित्य**

तेव्हा भगवान शिव म्हणाले, ही मुलगी अत्यंत शूर, पराक्रमी असेल जेव्हा तिला तिचा योग्य वर मिळेल त्याच क्षणी तिचे तिसरे स्तन नाहीसे होईल. ती आपला वर ओळखू शकेल. ही मुलगी म्हणजेच पार्वती असून तिचा विवाह शिव शंभूशी होईल.

या भाकिताप्रमाणे मीनाक्षी अत्यंत धाडसी शूर व पराक्रमी होती. तिने त्या राज्यावर होत असलेली आक्रमणे रोखून त्यांचा पाडाव केला. सर्वत्र विजय मिळवून तिने देवांनाही हरविले. एकदा ती वनात गमन करीत असताना तिला एक तरुण भिक्षूक दिसला. हा तरुण भिक्षूक मीनाक्षीच्या मनात भरला व हाच आपला पती आहे, असे तिला वाटायला लागले. त्याच क्षणी चमत्कार झाला व तिचे तिसरे स्तन क्षणार्धात नाहीसे झाले. या तरुणाचे नाव सुंदरेश्वर असे होते. जे साक्षात शिव प्रभू होते.



सुंदरेश्वरा सहित मीनाक्षी मदुराई शहरात परतली. तिथे तिचा विवाह सुंदरेश्वराशी लावून देण्यात आला. आणि तिचा राणी म्हणून राज्याभिषेक ही लगेच करण्यात आला.

मंदिरास दिव्य संतांच्या भेटी :

या मंदिरात आजवर अनेक संतांनी भेटी दिल्या. लाखो करोडो माणसे सतत मंदिरात दर्शनास येत असतात. ज्यांची प्रामुख्याने नोंद झाली असे तमिळ परंपरेतील महान संत, साईवा भक्त मंडळी, तेवाराम कवी, संत सबंधर, अपार तिरून बुक्का सर ,संत सुंदरर इत्यादी प्रमुख संतांच्या भेटीची नोंद आहे.

मंदिरातील उत्सव :

मंदिरात दिवसभर अनेक अनुष्ठाने चालतात प्रातःकालीन अभिषेक अलंकार पूजा आरती भूषण व संध्याकाळी विशेष आराधना चालते याशिवाय पाळणा उत्सव ही प्रेक्षणीय आहे. त्यासाठीच्या एका वेगळ्या मंडपात एक झोपाळा बांधला आहे त्यावर मीनाक्षी माता व सुंदरेश्वर स्वामी यांची प्रतिमा ठेवून त्या दोघांना झोका दिल्या जातो व त्यावेळी भक्त लोक भक्ती गीतात वातावरण भरून टाकतात.

याशिवाय अवनिमुलम नावाचा अल्वारांचा तीर्थात स्नानाचा एक विधी आहे.

मंदिरात एक स्वर्ण कमल तळे आहे या तळ्यात हे स्नान घातल्या जाते.

प्रमुख उत्सव : मीनाक्षी तिरुकल्याणम चितराई उत्सव हा उत्सव तमिळ महिना एप्रिल मे मध्ये येतो हा उत्सव ३० दिवस चालतो यातील पंधरा दिवस देवीचा राज्याभिषेक आणि विवाह आणि त्यानंतर पाचव्या ठिकाणी अलगर म्हणजे विष्णू यांची यात्रा पालखी यात्रा या दोन्हीही घटना एकत्र साजऱ्या केल्या जातात या काळात विशेष विशाल आहे रथयात्रा निघते भाविक हजारोंच्या संख्येने या पालखी आपला स्पर्श व्हावा आणि आपण कृत कृतार्थ व्हावे या भावनेने पालखीचे दर्शन घेतात या काळात रोजच अन्नदान मोठ्या प्रमाणावर होते.

मदुराई चे मंदिर म्हणजे शिल्पकलेचा एक उत्कृष्ट नमुना आहे पाषाणात साकारलेलं ते स्वर्गाचे चित्र आहे तेथील झुला मंडप सहा स्तंभाचा असून येथे दर शुक्रवारी मीनाक्षी देवी व सुंदरेश्वर भगवंतांच्या मूर्ती झोपाळ्यावर ठेवून भक्ती भावाने तो झोपाळा झुलविल्या जातो. याशिवाय तिथे अष्ट शक्ती मंडपम हा पूर्वेच्या गोपुरा कडे आहे. येथील स्तंभावर जगदंबेचे आठ रूप शिल्प म्हणून साकारण्यात आलेली आहेत. याशिवाय १००० स्तंभ असलेला एक मंडप आहे तोही खूप पाहण्यासारखा आहे या स्तंभाचे निर्माण अरियानाथ मुदली यार यांनी १५६९ मध्ये केले. याच्या प्रवेशद्वारावर घोड्यावर बसलेली अरियानाथ यांची मूर्ती आहे. तेथील प्रत्येक स्तंभावर विविध मूर्ती कोरलेल्या आहेत. या शिल्पकलेच्या उत्कृष्ट नमुना आहेत. विविध भावछटा ,आभूषणे, वस्त्र प्रावरणे पौराणिक कथा या तिथे प्रत्यक्ष अवतरल्या आहेत असा भास होतो. मूर्ती पाहण्यात देहभान हरपून जाते.

इथे मीनाक्षी माता आणि सुंदरेश्वर भगवंताचा विवाह सोहळा एका मंडपात दरवर्षी साजरा करण्यात येतो. येथे विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, पार्वती मातेचा भाऊ म्हणून प्रत्यक्ष विष्णू तिचा हात भगवान शंभूच्या हातात देऊन कन्यादानाचा विधी पार पाडतात. असे येथे सुंदर शिल्प आहे.

जगदंबेच्या मुख्य गाभाऱ्यात मध्यरात्रीनंतर कोणीही प्रवेश करत नाही. याचे कारण असे की, भगवान शिव सुंदरेश्वर रूपात रोज रात्री माते समवेत एकांतात येथे येत असतात.

एकूणच हे मंदिर पार्वती माता आणि शिवप्रभूच्या चिरंतन वासाने पवित्र झालेले असे दिव्य स्थान आहे.

जगदंबेच्या व शिवप्रभूच्या चरणावर विनम्र होऊन आपण इथे थांबूयात. पार्वती पते हर हर महादेव

जय हरी माऊली



# नात्यातील गहिरेपणा दर्शविणारे नाटक – बाप रे बाप !

**ज्योतिर्मय साहित्य**

आयुष्यभर संघर्षाने कुटुंबाचा गाडा ओढत मुलांच्या भवितव्यासाठी प्रामाणिकपणे धडपडणाऱ्या आणि जबाबदारीचे ओझे वाहणाऱ्या बापाचे महत्त्व अधोरेखित करणारे सदानंद बोरकर यांचे नाटक म्हणजे बाप रे बाप! ...होय! संसारासाठी खस्ता खात तडजोडीने जगणाऱ्या बापाच्या त्यागाचा जराही विचार न करता केवळ स्वतःचे आयुष्य नोकरीच्या माध्यमातून सजविता यावे यासाठी प्रसंगी बापालाही संपविण्याचा विचार करणाऱ्या स्वार्थी पिढीच्या वाईट मनोवृत्तीचे दर्शन घडविणारे हे सामाजिक नाटक. ज्येष्ठ रंगकर्मी सदानंद बोरकर यांच्या लेखणीतून आणि दिग्दर्शनातून जन्माला आले आहे. १६ नोव्हेंबरला लाखांदूर येथे हाऊसफुल गर्दीत प्रेक्षकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात या नाटकाचा शुभारंभाचा प्रयोग प्रत्यक्ष बघण्याचा योग आला. सदानंद बोरकर यांचं अनुकंपा या अभिनव विषयावरील नवकोरं नाटक, फुल्ल कॉमेडीच्या सादरीकरणामुळे रंगतदार ठरले.

नाविन्यपूर्ण अशा वेगळ्या विषयाने प्रारंभापासून अखेरपर्यंत भन्नाट कॉमेडीमुळे प्रेक्षकांची पकड धरत गतिमानतेने सरकणारे हे नाटक आनंददायी स्वरूपाचे. नोकरीसाठी मिळेल तो मार्ग स्वीकारून आटापिटा करणाऱ्या बेरोजगारांची व्यथा मांडत विदारकता दर्शविणारे हे नाटक. ‘‘बाप हा प्रत्येक मुलाच्या स्वप्नाचा पहिला रक्षक असतो. तो संकटाच्या आगीत उभा राहून लेकराला सावली देतो‘‘ हा भावनिक संदेश या देणारे आहे. नात्यातील विविध पदर मिश्किलपणे उलगडत नाटकातून वास्तविकता मांडण्याचा नाटककाराचा प्रयत्न निश्चितच स्तुत्य आहे. अनुकंपेच्या माध्यमातून नोकरी मिळवण्यासाठी मुलाने बापाला विष दिल्याने बापाचा मृत्यू होतो असे गृहीत धरलेल्या प्रेक्षकांना मात्र नाटककाराने अनपेक्षित चांगलाच धक्का देत सरतेशेवटी अप्रतिम सामाजिक संदेश दिलेला आहे. या नाटकातील बबली मावशी हे पात्र छोटेसे असले तरी संवादागणिक



प्रेक्षकांना हसविणारे आणि रंगत वाढविणारे गमतीदार अन मजेशीर आहे. विशेष म्हणजे या नाटकातील पात्रांच्या मिश्किल स्वाभाविक संवादातून होणाऱ्या विनोद निर्मितीमुळे प्रेक्षकांना नाटक संपेपर्यंत कुठेही बोर होऊ देत नाही.

**प्रा. राजकुमार मुसणे**
**गडचिरोली**

सायलेन्सर , मनोरंजन, सर्कस , सेकंड हॅण्ड ,घानमाकड, बैताड मेहुणी, बातमीसाठी दिवे लावणे, सर्कशीतल रिंग मास्टर, फिफ्टी फिफ्टी अशा द्विअर्थी विशेषणामुळे प्रसंगातील झणझणीत कॉमेडीच्या तडक्याने प्रेक्षक खळखळून हसतो. घरातील सामंजस मात्र निपुत्रिक सुनेकडे पाहण्याचा कजाग सासूचा दुय्यम दृष्टिकोन, सावत्रपणाची जाणीव , नात्यातील अंतर अशा अनेक विषयांना कवेत घेत उत्तम नाट्य सादर होते. प्रसंगानुरून स्त्रियांची भिन्न भिन्न रूपे या नाटकातून साकार होतात. प्रकाश (मुलगा) च्या भावनिक कवितेतून खरा हिरो म्हणजे आपला बाप असल्याचे सुचविले आहे. ‘‘जगातील कोणतीही ताकद बापाला संपवू शकत नाही, रोज हजारो काट्यावर तो चालतो, फक्त मुलाच्या पायाखाली गुलाबाचे गालीछे अंथरावेत म्हणून तो स्वतःच्या स्वप्नांना तिजोरीत बंद करुन ठेवतो आणि मुलाच्या स्वप्नांना तो पंख देतो.‘‘ अश्या मौलिक संवादामुळे बापाच्या कर्तृत्वाची उंची महान झालेली आहे. बापाच्या ५७ व्या वाढदिवसाचा हर्ष, उत्सव अधिक मनोरंजक असून त्यात सामील सर्वच पात्रानी आपापल्या कलांचे सादरीकरण करुन रंगत आणलेली आहे. वेळेचे भान, कौटुंबिक नाट्याशय,प्रसंगानुरूप साजेसे नेपथ्य, पात्रानूरूप वेशभूषा, मिश्किल संवाद, जबरदस्त संवादफेक, नेमकेपणा आणि गतिशीलता यामुळे उत्तम *बापरे बाप!* या सुखात्मिकेचा नाट्यरसिकांनी मनमुराद आस्वाद घेतला. साजेसे नेपथ्य आणि सुंदर पार्श्वसंगीताने सजलेल्या ह्यां नाटकात सातपुतेचा जिगरी आणि लंगोटी यार, अविवाहित मात्र रोमँटिक डॉ. सुळे (कमलाकर कामडी), गंभीर आणि प्रगल्भ मुलगा प्रकाश (पराग सहारे), खट्याळ बबली (देवयानी जोशी), कजाग सासू (पूजा पिंपळकर), कुटुंबवत्सल सून (आसावरी रामेकर), धाकटा मुलगा इंद्रनील (कौशल जोशी ), स्लो मोशन नोकर चमन (राहुल बोरकर)

मॅचच्या शेवटी शेवटी येऊन बॅटिंग करून हास्याची फवारणी करणारा बबलू (देवेंद्र लुटे) आणि बापाच्या मुख्य भूमिकेतील अष्टपैलू कलावंत सदानंद बोरकर सर यांच्या सदाबहार अभिनयाने नाट्यप्रयोग बाप ठरला हे नक्की. सरतेशेवटी नाटकातील एक प्रमुख पात्र सुळेकाका बापाविषयी आपलं मत मांडताना म्हणतात ते बापाचं ममत्व सिद्ध करणारं आहे. ‘‘जगात आईच्या दुधाचा ऊर पवित्र असतो. पण बापाच्या घामाचा थेंबही त्याहून कमी पवित्र नसतो.‘‘... एवढंच

# भेलके महाविद्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा

**ज्योतिर्मय साहित्य**

भेलके महाविद्यालयात भारतीय संविधान दिन मोठ्या उत्साहात व अभिमानाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये संविधानाविषयी जाणीव निर्माण करणे, लोकशाही मूल्यांची ओळख करून देणे आणि सध्याच्या सामाजिक–राजकीय परिस्थितीचा विवेकपूर्ण आढावा घेण्याची प्रेरणा देणे हा होता. कार्यक्रमाची सुरुवात संविधानाच्या उद्देशिकेच्या सामूहिक वाचनाने करण्यात आली.

कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तुषार शितोळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना भारतीय संविधान हे केवळ कायद्याचे संकलन नसून ते देशाच्या लोकशाही व्यवस्थेचा आधारस्तंभ आहे, असे सांगितले. त्यांनी सध्याच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत




संविधानिक मूल्ये जपण्याची जबाबदारी तरुणांवर अधिक असल्याचे अधोरेखित केले.यावेळी प्रा. सहदेव रोडे यांनी संविधानाने दिलेल्या मूलभूत हक्क व कर्तव्ये यांचे संतुलन राखण्याची गरज स्पष्ट केली. तर प्रा. लांडगे संदीप यांनी आजच्या काळातील आव्हाने, सामाजिक माध्यमांचा प्रभाव, नागरिकांची भूमिका यावर भाष्य करून विद्यार्थ्यांना सजग आणि जबाबदार नागरिक होण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विद्यार्थिनी दिव्या मालुसरे हिने संविधानामुळे मिळालेले समानतेचे अधिकार, शिक्षणाची संधी आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य याबद्दल मनोगत व्यक्त केले. तिने तरुण पिढीने संविधान समजून घेऊन त्याची अंमलबजावणी प्रत्यक्ष जीवनात करणे किती आवश्यक आहे, हे प्रभावीपणे मांडले.

या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने प्रा. जाधवर दयानंद यांनी केले होते. संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध व प्रेरणादायी वातावरणात पार पडला. यावेळी डॉ. रोहिदास ढाकणे प्रा. सहदेव रोडे, प्रा.पौर्णिमा कारळे, प्रा.भगवान गावित , प्रा जीवन गायकवाड, प्रा.संदीप लांडगे,प्रा. दयानंद जाधवर, प्रा. महेश कोळपे प्रा.माउली कोंडे, डॉ. गणपत आवटे, प्रा.भूषण समगीर, प्रा. अंकिता महांगरे, प्रा.वैष्णवी कोंडे , विकास ताकवले, शिवाजी सोनावणे, श्री. महेश दळवी, सीमा देशमुख उपस्थित होते. सुमित कांबळे आणि अभिषेक मोरे यांचे विशेष सहकार्य लाभले. या संविधान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये संविधानाबद्दल आदर, जागरूकता आणि राष्ट्रभक्तीची भावना अधिक दृढ झाली. कार्यक्रमाचा समारोप प्रा. कोंडे माऊली यांनी केला.



# श्रीयश आयुर्वेदिक येथे नवीन बॅचचा इंडक्शन कार्यक्रम संपन्न

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – श्रीयश आयुर्वेदिक कॉलेज अँड हॉस्पिटल रिसर्च सेंटर छत्रपती संभाजी नगर येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचा इंडक्शन चा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी सर्व प्रवेशित विद्यार्थी व त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाकरिता माननीय इंजिनियर श्री बसवराज मंगरूळे साहेब, संस्थेचे चेअरमन यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. याप्रसंगी त्यांनी विद्यार्थी व पालक यांच्यासोबत संवाद साधला आणि आयुर्वेदाचे भवितव्य उज्वल असून या संधीचा सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांनी उपयोग करून घ्यावा असा महत्त्वाचा सल्ला दिला. याशिवाय रुग्णालय अधीक्षक डॉक्टर परेश देशमुख यांनी आयुर्वेद पदवीधरास उपलब्ध असलेल्या सर्व संधींच्या बाबत मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉक्टर स्वाती इटगी यांनी बी ए एम एस कोर्स बद्दल माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉक्टर कार्तिकी व्यास यांनी केले आभार प्रदर्शन डॉक्टर निवेदिता ताजणे यांनी केले. सर्व कार्यक्रम उत्तम नियोजनाद्वारे पार पडण्याकरिता वरिष्ठ वर्गातल्या विद्यार्थ्यांची, श्रीयश आयुर्वेदिक कॉलेजच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाकरिता संस्थेचे अध्यक्ष बसवराज मंगरुळे यांनी प्राचार्य सर्व शिक्षक वृंद शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांचे अभिनंदन केले.

# महाराष्ट्रातील ‘‘दारिद्र्याची शोधयात्रा’’...

**ज्योतिर्मय साहित्य**

महाराष्ट्र राज्य निर्मितीला पासष्ट वर्षे पूर्ण झालीत. अनेक सरकार आलीत. विकासाच्या अनेकविध योजना राबविल्या गेल्यात. शिक्षण क्षेत्राचा विकास विस्तार झाला. तरी पण अजूनही अनेक घटक असे आहेत, ते योजनांचे पासून, शिक्षणापासून वंचित आहेत. खूप दूर आहेत. दरडोई उत्पन्नात वाढ दिसत असली तरी दुसरीकडे देशातील एकूण गरिबांपैकीमोठ्या टक्केवारीने गरीबी महाराष्ट्रात आहे.

मुंबई, पुणे, नासिक, नागपूर, औरंगाबाद, अशी स्मार्ट शहरे, आणि अशीच काही जिल्ह्यांची शहरे, तालुके बघितली तर सगळीकडे झगमगाट आहे. मोठ्या प्रमाणात निधींची उपलब्धता होते. सर्व सुखसोयी आहेत.रस्ते, पाणी, वीज, अन्नधान्य, मनोरंजन, कशाचीही चिंता नाहीये.मॉल मध्ये गर्दी मावत नाहीये. प्रवासाची चिंता नाही. राजकिय नेत्यांच्या स्वागताला लाखो रुपये खर्च होत आहेत.ईथला विकास बघता हा आहे आपणा सर्वाना पडद्यावर दिसणारा महाराष्ट्र. पण पडद्याआडचा ही एक महाराष्ट्र आहे. कसा आहे तो?

अलीकडेच ‘‘दारिद्र्याची शोधयात्रा‘‘ हे हेरंब कुलकर्णी यांचे पुस्तक वाचण्यात आले. त्यांच्या ह्या पुस्तकातून पडद्याआडचा महाराष्ट्राच विदारक दर्शन घडल. वाचून अस्वस्थ वाटलं.कारण ते सत्य आहे. काहीस भिषण, भयाणकही आहे.

हेरंब कुलकर्णी हे व्यवसायाने शिक्षक आहेत. त्यांनी जवळजवळ पाच महिने रजा घेउन महाराष्ट्रातील ग्रामीण भागात, खेड्यापाड्यात आणि त्या बाहेरही राहणाऱ्यांच्या जीवनाचा शोध घेतला.महाराष्ट्रातील बुलढाणा,यवतमाळ, वाशिम, उस्मानाबाद, हिंगोली,परभणी,लातूर, जालना,नांदेड, बीड, पालघर, चंद्रपूर, नंदुरबार, गडचिरोली, सांगली, सातारा, असे २४,जिल्हे. त्या जिल्ह्यातील गरिब तालुके, त्यातील गरिब गावे,त्या लगतच्या गरिब वस्त्या, पाडे,अशा १२५ ठिकाणी जाऊन, विट कामगार, उस तोड कामगार, दगडफोड कामगार, शेतमजूर, शेतकरी, बेरोजगार तरुण, यांच्या प्रत्यक्ष भेटी घेउन त्याच्या समस्यां जाणून घेतल्या.

काय आहे गरिबी ? हे गरीब काय खातात. कसे रहातात? त्यांच्या पातळीवर शिक्षणाची काय परिस्थिती आहे.त्यानां मिळणाऱ्या आरोग्य सुविधा कशा आहेत.? रस्ते, पाणी, वीज, अन्नधान्य पुरवठा, गावपातळीवरील प्रशासन, त्यांचे त्यांना मिळणारे सहकार्य. कल्याणकारी योजनात होणारी अडवणूक. स्थलांतरित मजूर भटकेविमुक्त, असंघटित मजूर, शेती–आत्महत्या, दारु व्यसन, या बाबतीत त्या त्या भागातील लोकांशी प्रत्यक्ष चर्चा करुन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

त्या भागातल्या सामाजिक




संस्था, जसे–श्रमजीवी संघटना –पालघर, श्रमिक एल्गार–चंद्रपूर, मेळघाटमित्र–चिखलदरा, स्वामिनी दारूबंदी –यवतमाळ अशा संस्थानाही भेटी देऊन त्यांचे सहकार्य मिळवले. अनिल अवचट, पी. साईनाथ, अनिल शिदोरे, अजित अभ्यंकर, आदींशी चर्चा करुन या अभ्यासासाठी सहकार्य लाभले.

कुळकर्णी यांच्या ह्या शोधयात्रेतून अनेक गोष्टी आपल्या समोर आल्या आहेत.अनेक योजना आहेत, जसे संजय गांधी निराधार, श्रावणबाळ, विधवा वेतन, अपंगासाठी सहाय्य योजना आहेत. त्याचा लाभ घेण्यासाठी लाच द्यावी लागते.बचत गट आहेत. पण बरेच गट सबसिडी मिळविण्यासाठी होते. काही महिलांनी गट स्थापन केले, गाई, म्हशी, घेतल्या.पण त्यांचे विमा न घेतल्याने जनावरे रोगराईत मृत झाल्यावर नुकसानभरपाई मिळाली नाही.योग्य मार्गदर्शन होत नाही.

महाराष्ट्रातील ह्या भेटी दिलेल्या भागात कल्याणकारी योजनात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचारआढळूनआला. मराठवाडयात हे प्रमाण जास्त आढळले.वायरमनचे प्रशिक्षण घेतलेल्या तरुणाला मुद्रा लोनविषयी सांगितलं तो म्हणाला बँकेत असा आदेश आला नाही सांगितलं जाते. अनेक प्रकारच्या योजना येतात पण माहितीची टाळाटाळ केली जाते. तरुण लाभापासून वंचीत रहातात. ग्रामीण भागात दारुचा प्रश्नही गंभीर वाटला.

वर्धा जिल्ह्यात तर चक्क चार आमदारांनीच दारुबंदी उठवण्याची मागणी केल्याच सत्य समोर आणलय. दारुबंदी कार्यकर्त्यांना मारहाण होते.निवडणूक काळात तरुणांना दारुच आमिष असत. त्यामुळे व्यसनाधिनता वाढली आहे. अनेक ठिकाणी शेतीकाम आटोपल्यावर काम नसते. त्यामुळे स्थलांतर मोठ्या प्रमाणावर होते. उसतोड, वीटकाम, दगडकाम, मजुरांचे स्थलांतर अधिक आहे. प्रत्येक ठिकाणचे काम संपल्यावर कामाच्या शोधात स्थलांतर अटळ आहे. शेवटी पोटासाठी फिरावेच लागते.हे सर्व लोक उपाशी रहात नसले तरी, त्यांच्या वाट्याला येणार अन्न सकस,पोषक तर नसतेच.जे जसे मिळेल त्यावर समाधान मानावेच लागते.अल्पशेती त्यावरच मजुरी. अशाश्वत उत्पन्न, आत्महत्या,हे भिषण समोर आल. गरिबी कमी करायची, निर्मूलन करायचं तर शेतीत सुधारणा करण्याचा पर्याय समोर आल्याचे निदर्शनास आले. नंदूरबार जिल्ह्यात अनेक गावात वीज नाही. १९९५ साली मनोहर जोशी मुख्यमंत्री असतांना तोरणमाळ भागात रस्त्याच दिलेल आश्वासन बावीस वर्षा नंतरही पूर्ण झालेले नव्हते. नाही ही शोकांतिका आहे.

तीन हजार वस्तीच्या ठिकाणी दारु दुकान उघडता येते, हा सरकारी




निर्णय आहे.पण आरोग्य केंद्र सुरु करायला पाच हजाराची अट आहे. अशा ठिकाणी आरोग्याची दैन्यावस्था आहे. नेमलेले डॉक्टर,नर्स, अशा ठिकाणी फारसे जात नाही. ग्रामिण आरोग्य केंद्रात अनेक औषधी नसते.मुलांमध्ये कुपोषण आढळते.अशा अनेक गोष्टी समोर येतात.

हेरंब कुलकर्णी यांची शोधयात्रा जरी लिखाणातून संपली असली तरी त्यांनी अनेक प्रश्न आपल्या समोर,ह्या व्यवस्थे समोर उभे केले आहे. आपल्या स्वतःपलीकडच जग आहे.त्याच खरखुर चित्र लिखाणातून आपल्या समोर उभं केल आहे.ते खरोखरच विचार करण्या सारखे आहे. त्यावर विचार मंथन ही काळाची गरज आहे.पडद्याआडच्या महाराष्ट्रात काय भिषणता आहे हे पडद्यावर दाखवण्याचा अतिशय प्रामाणिक प्रयत्न त्यांनी केला आहे हे नक्की.पुण्याचे समकालीन प्रकाशनाने हे पुस्तक प्रसिध्द केले आहे. महाराष्ट्रातील काना कोपऱ्यातील परिस्थिती जाणून घेण्यासाठी हे पुस्तक वाचायलाच आहे.

विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता अशा एकल महिलांसाठी ते काम करतात. शाळा परिसरात टपऱ्यांवर मिळणाऱ्या गुटख्या मुळे शालेय विद्यार्थ्यांमध्ये व्यसन निर्माण होते. परिणामी ते व्यसनी होतात. त्यासाठी टपऱ्या हटवण्याचे आंदोलन त्यांनी छेडले होते. वेळोवेळी सामाजिक प्रश्नामध्ये त्याचा सहभाग असतो. त्यांच्या अनेक कार्यामुळे त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले आहेत.

संपर्क.:हेरंब कुळकर्णी,
८२०८५८९१९५

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559